# ओळख

एखाद्या नवीन जागी आपण राहायला जातो तेंव्हा शेजारी-पाजारी यांच्याशी आधी चेहऱ्याने ओळख होते. तेच तेच चेहरे दिसले की कळते हे आस-पास राहणारे आहेत. त्यांनाही मग आपला चेहरा बघून बघून आपण तिथे नव्याने राहायला आलेले असल्याचे कळते. मग कधी हाय, हॅलो, स्मितहास्य आणि कालांतराने ओळख सवयीची होते आणि आपण त्या जागेचे होऊन जातो.

एकाच रस्त्याने प्रवास करणाऱ्या गाड्या पण काही वेळाने सवयीच्या, ओळखीच्या होतात हे कधी नोटीस केलंय का तुम्ही? मला हे नेहमीच जाणवतं ड्राईव्ह करताना. परवाच San Jose to LA हा साडेपाच-सहा तासांचा ड्राईव्ह मी जाता-येता एकटीने केला. अलीकडे रस्त्यांवर वाढलेले वाहनांचे प्रमाण, आणि ते चालवणाऱ्या माणसांचा कमी झालेला पेशन्स या समीकरणातून एवढे लांबचे पल्ले गाठायचे म्हणजे जीव मुठीत घेऊनच निघावे लागते प्रवासाला. या LA to San Jose प्रवासात जो मधला हायवे ५ (गोल्डन स्टेट हायवे) आहे ना, तो १५०+ मैल २ लेन चा सरळसोट रस्ता आहे. म्हणजे San Jose वरून LA ला निघालेल्या सगळ्याच गाड्या थोड्या फार फरकाने पुढे-मागे करत याच हायवे वरून जातात. बऱ्याचदा या १५०+ मैलांच्या पट्टयात गाडी “क्रूज कंट्रोल” वर ८०-८५ मैल प्रति-ताशी वेगाने सेट करून वाहन चालक गाड्या पळवत असतात. मी पण त्याला अपवाद नाही. यावेळी परत येताना माझ्या Hyundai Santa Fe ची ओळख लाल रंगाची ऑडी SUV, होंडा ओडिसी चंदेरी रंगाची, काळी टोयोटा कॅम्री, लाल रंगाचीच शेव्ही कोर्व्हेट आणि एका राखाडी रंगाच्या फोर्ड एस्केप यांच्याशी झाली. एकमेकांमध्ये सुरक्षित अंतर, लेन्स बदलताना नीट सिग्नलिंग, नियंत्रित वेग असा सगळा छान ताळमेळ राखत पार LA पासून या गाड्यांनी मला या प्रवासात साथ दिली. म्हणजे इतर गाड्याही होत्याच रस्त्यावर आत-बाहेर करत, पण बहुतांशी प्रवासात साथ करण्याऱ्या, माझ्या नजरेनी टिपलेल्या या मी सांगितलेल्या गाड्या. सगळ्यात आधी Gilroy च्या Exit ला लाल कोर्व्हेट आणि होंडा ओडिसी ने हायवे वरून exit मारला. मला पुढे जायचे होते, पण या दोन गाड्या निघून गेल्यावर पुढची २-३ मिनिटं गाडी चालवताना मला चुकल्यासारखे झाले. Gilroy पासून पुढे San Jose ला येताना एकुणच traffic वाढले आणि त्यात माझ्या या प्रवासात ओळखीच्या झालेल्या इतर गाड्याही हरवून गेल्या.

घराच्या ड्राईव्ह-वे मधे गाडी आणून उभी केली आणि मनात हुश्श झाले. प्रवास खरंच छान झाला. ‘नव्या’ ओळखींनी मस्तं साथ दिली. आई-बाबांची कंपनी पण होतीच गप्पा मारायला! मला ड्राईव्हिंग असेही खूप आवडते. गेली १७ वर्षं मी इथे बरीच गाडी चालवली आहे. परंतु अलिकडे गाडी चालवतानाची लोकांची बेफिकिरी थोडी वाढली आहे आणि केवळ तुम्ही चांगले ड्राईव्हिंग करून भागत

नाही तर इतर वाहन चालक पण तसेच काळजीपूर्वक गाडी चालवणारे लागतात, तरच तुमचा प्रवास सुखाचा आणि संस्मरणीय होतो. आमचा हा LA चा जाता-येताचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित केल्याबद्दल त्या सर्व चारचाकी साथीदारांचे आणि त्यांच्या चालकांचे मनापासून आभार !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**